**खालील दिलेल्या  काव्यपंक्तीचे रसग्रहण करा. (4 Marks)**

**उन्हातानात, रोज मरते**
**बाई मरते**
**हिरवी होऊन, मागं उरते**
**बाई उरते**

**खोल विहिरीचे, पाणी शेंदते**
**बाई शेंदते**
**रोज मातीत, मी ग नांदते**
**बाई नांदते.**

**आशयसौदर्य**: 'रोज मातीत' या कवितेमध्ये कवयित्री कल्पना दुधाळ यांनी शेतकरी स्त्रीच्या कष्टाचे वर्णन यशोचित शब्दात केले आहे. उपरोक्त ओळींमध्ये शेतात शेतकरी स्त्री चे नांदणे कसे कष्टमय असते याचे हृदय शब्दात वर्णन त्यांनी केले आहे.

**काव्यसौंदर्य:** शेतकरी महिला आपल्या संसारासाठी शेतजमिनीत अहोरात्र खपत असते. ती वाफ्याच्या सरीने कांदा लावते. मग दाबून उसाची कांडी जमिनीत पुरते हे सर्व कष्ट उन्हात, उन्हाची पर्वा न करता अविरत करत असते. ती जमिनीत आपले आयुष्य समर्पित करते. पुढचे हिरवे स्वप्न पाहते. सुगीच्या हंगामा जेव्हा तरारलेले हिरवेगार शेत फुलते, तेव्हा जणू या हिरवेपणातच तिचे कष्टच उगवून आलेले असतात. खोल विहिरीतून पाणी उपसून ती पिकांना पाजते. अशा प्रकारे संसार फुलवण्यासाठी शेतकरी स्त्री रोज मातीत नांदत असते.

**भाषासौंदर्य**: अतिशय साध्या, सोज्वळ भाषेमध्ये कवितेतील शेतकरीण आपले मनोगत व्यक्त करते. तिच्या हृदयातील बोलांमधून ती सोसत असलेले कष्ट कळून येतात. हिरवे होऊन मागे उरणे रोज मातीतदाणे नांदणे, या प्रतिमा काळीज हेलावून टाकणारे आहे. या कवितेतील प्रत्येक शब्द रचनेतून शेतकरी स्त्रीचे कष्टमय जीवन डोळ्यांसमोर साकारतं व उलगडत जाते.